दैनिक
# दिव्य मातृछाया
बुलडाणा
मंगळवार, दि. ३ जून २०२५
● वर्ष : चौथे ● अंक : २७ ● पाने : ४ ● RNI.NO. MAHMAR/2022/87711 www.matruchhaya.in ● मुख्य संपादक : सादिक कुरेशी 9420647272 ● कार्यकारी संपादक : आसिफ गवळी 9767681555

# “अजित पवारांनी राजीनामा दिला पाहिजे”

## लाडकी बहीण योजनेचा उल्लेख करत संजय राऊत यांची मागणी

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन



**मुंबई :** लाडकी बहीण योजनेतील अपात्र महिलांची अनेक प्रकरणे समोर येत आहेत. या योजनेत अनेक चुका झाल्या आहेत. सरसकट सर्वांना लाभ देणे चुकीचं होतं, अशी कबुली उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. योजनेतील अर्जांच्या पडताळणीचे काम सुरु असून यापुढे फक्त गरजू आणि पात्र महिलांना लाभ दिला जाईल, असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. ते सोमवारी प्रसारमध्यमांशी बोलत होते. याच मुद्द्यावर प्रश्न विचारला असता संजय राऊत यांनी अजित पवारांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसला. महाराष्ट्रात महायुतीचे १७ खासदारच निवडले गेले. त्यानंतर महाराष्ट्र जिंकण्यासाठी महायुतीने कंबर कसली होती. लाडकी बहीण योजना ही विधानसभा निवडणुकीच्या आधी सुरु करण्यात आली होती. ही योजना निवडणुकीपुरतीच आहे अशी टीका विरोधकांनी केली होती. मात्र ही योजना बंद होणार नाही, आम्ही लाडक्या बहिणींना मदत करणारच अशी भूमिका सरकारने घेतली होती. ज्यानुसार ही योजना अजूनही सुरु आहे. दरम्यान अजित पवारांनी जी कबुली दिली त्यावर संजय राऊत यांनी टीका केली आहे.

अजित पवारांनी राजीनामा दिला पाहिजे-संजय राऊत

लाडकी बहीण योजनेत अपात्र बहिणींना लाभ दिला असं अजित पवार म्हणत असतील तर त्यांनी प्रायश्चित्त म्हणून राजीनामा दिला पाहिजे. अर्थखात्यातून घोटाळा झाला आहे. या राज्याचे पैसे लुटले कुणी? लाडक्या बहिणींनी नाही तर लाडकी भावांनी नावं बदलून हा लाभ घेतला आहे. शेकडो कोटी रुपयांचा लाभ सरकारी कर्मचाऱ्यांनी घेतला, तुम्ही छाननी केली नाहीत कारण तेव्हा तुम्हाला मतं हवी होती. अर्थ खात्याच्या माध्यमातून ही संपूर्ण लूट झाली. याचं प्रायश्चित्त अजित पवारांनी राजीनामा देऊन घेतलं पाहिजे अशी मागणी संजय राऊत यांनी केली आहे.

### राऊत यांची सरकारवर जोरदार टीका

◆ **या राज्यातल्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना लोकांच्या प्रश्नांविषयी किती गांभीर्य आहे? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना किती गांभीर्य आहे? याबाबत त्यांनी चिंतन बैठक घेतली पाहिजे. मला सांगा एकनाथ शिंदे यांना राज्याच्या कुठल्या प्रश्नावर किती गांभीर्य आहे? राज्याच्या कोणत्या प्रश्नांवर किंवा समस्यांवर त्यांनी काम केलं आहे? टेंडर काढणं, ठेकेदारांकडून पैसे घेणं आणि पक्ष फोडणं, माणसं फोडणं हेच चाललं आहे. एकनाथ शिंदेंप्रमाणेच अजित पवारही हेच करत आहेत आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही हेच करत आहेत. राज्याला प्रतिष्ठा कोण प्राप्त करु देणार? मुख्यमंत्री लग्न सोहळ्यात आहेत. आधी कुंभमेळ्याच्या बैठका झाल्या आता लग्न सोहळे होतील असा टोला संजय राऊत यांनी महायुती सरकारला लगावला आहे.**

### काका–पुतण्यांची बंद दाराआड चर्चा

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन्ही गट लवकरच एकत्रित येणार अशी चर्चा महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात सुरू असताना ज्येष्ठ नेते शरद पवार व उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा एकदा पुण्यात एकाच व्यासपीठावर दिसून आले. पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये साखर उद्योग व कृषी क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबत आयोजित एका कार्यक्रमात दोन्ही नेत्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी शरद पवार, अजित पवार आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार गट)च नेते जयंत पाटील यांच्यात बंद दाराआड चर्चा झाली.

# माजी आमदार बाबाजानी दुर्राणी पुन्हा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जाणार

## रविवारी पाथरीत होणार पक्षप्रवेशाचा कार्यक्रम

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन




**परभणी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असून येत्या रविवारी (दि.८) पाथरी येथे त्यांचा हा पक्षप्रवेश सोहळा पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर बराच काळ बाबाजानी दुर्राणी हे शरद पवारांशी एकनिष्ठ राहिले होते. पुढे त्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आणि ते या पक्षाचे जिल्हाध्यक्षही झाले. त्यानंतर पुन्हा छत्रपती संभाजीनगरात झालेल्या एका कार्यक्रमात बाबाजानी यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. गेल्या काही महिन्यांपासून ते राजकीय निर्णय घेण्याबाबत विचारात होते. आता पुन्हा अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

बाबाजानी हे शरद पवारांचे जुने समर्थक आहेत. आपल्या राजकारणातला दीर्घकाळ त्यांनी पवारांच्याच नेतृत्वाखाली काम केले आहे. १९८० पासून ते पवारांसोबत आहेत. त्या वेळच्या एस. काँग्रेसमध्येही ते होते. चरख्याच्या चिन्हावर त्याकाळी मराठवाड्यात पाथरी, परतूर आणि उस्मानाबाद या तीन नगरपरिषदा निवडून आल्या होत्या. राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर परभणीचे पहिले जिल्हाध्यक्ष म्हणून बाबाजानी यांनीच जबाबदारी पार पाडली होती. अगदी अलीकडेपर्यंत ते या पक्षाचे दुसऱ्यांदा जिल्हाध्यक्ष राहिले. स्वतः अल्पसंख्य समाजातून येत असले तरीही जिल्ह्याच्या राजकारणात त्यांनी मुख्य प्रवाहातलेच राजकारण केले आहे. पाथरी नगरपालिकेवर त्यांचे गेली अनेक दशके एकहाती वर्चस्व राहिले.

**छत्रपती संभाजीनगर येथील एका कार्यक्रमात ‘कुछ तो मजबुरिया रही होगी, वरना युही कोई बेवफा नही होता’ असा शेर त्यांनी शरद पवारांसमोर ऐकवला. तरीही पक्ष सोडताना आपली कोणतीही मजबुरी नव्हती असेही ते म्हणाले. लोकसभा निवडणुकीत बाबाजानी यांनी अलिप्तता स्वीकारल्याने पक्षनेतृत्व आणि त्यांच्यात अंतर पडत गेले. बाबाजानी यांचा आमदारकीचा कार्यकाळ संपत असतानाच त्यांचे आणखी एक स्थानिक विरोधक राजेश विटेकर यांना पक्षाने विधान परिषदेची संधी दिली त्यामुळेही बाबाजानी गेल्या काही दिवसांपासून अजित पवार गटात अस्वस्थ होते. गेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी पुन्हा पाथरी मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवली. आता विटेकर व बाबाजानी यांच्यातही सख्य दिसून येत आहे.**

# निवडणुकीवेळी जाहिरात सत्ता येताच विश्वासघात?

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन



**नागपूर :** गतवर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या काळात ‘महायुती सरकारमुळे ओबीसी विद्यार्थ्यांचे परदेशी शिक्षणाचे स्वप्न पूर्ण झाले’, असे सांगणारी जाहिरात करण्यात आली होती. या जाहिरातीमध्ये झळकलेल्या चंद्रपूरच्या रोहित दिवसे या विद्यार्थ्याला आता मात्र त्याच परदेशी शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरविण्यात आले आहे.

राज्यातील इतर मागासवर्ग (ओबीसी) आणि विमुक्त भटक्या प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना २०१८-१९ पासून परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. याअंतर्गत रोहितने इंग्लंडच्या बर्मिंगहॅम विद्यापीठात एम.एस्सी. ॲडव्हान्स इंजिनीअरिंग मॅनेजमेंट या एक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. प्रवेशपत्राच्या आधारे त्याने ओबीसी विभागाकडे शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला. कागदपत्रांची छाननी करून त्याला पात्र ठरवण्यात आले. २६ सप्टेंबर २०२४ च्या ७५ पात्र विद्यार्थ्यांच्या यादीत २४ व्या क्रमांकावर रोहितचे नाव आहे. त्यानंतर निवडणूक काळात रोहित आणि त्याच्या कुटुंबाची मुलाखत समाजमाध्यमांमध्ये प्रसृत केली गेली. ज्या रोहितला पुढे करून सरकारने स्वतःची पाठ थोपटून घेतली होती.

मात्र आता यादी २०२४-२५ची आहे आणि रोहित जानेवारी २०२५मध्ये उत्तीर्ण झाल्याने त्याला लाभ देता येणार नसल्याचे ओबीसी विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. यादीत नाव आल्यामुळे रोहितने शिक्षणासाठी ५० लाखांचे कर्ज काढले आणि बर्मिंगहॅम विद्यापीठात गेला. मात्र आता अपात्र ठरल्याने त्याच्यासमोर गंभीर समस्या उभी राहिली आहे. पात्रता जाहीर करतानाच कागदपत्रांची पडताळणी केली नाही का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. यासंदर्भात इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल यांनी याप्रकरणी सविस्तर माहिती घेऊन प्रतिक्रिया देणार असल्याचे ‘लोकसत्ता’ला सांगितले.

**“सरकारने रोहितची निवड केली. त्याच्यावर विश्वास ठेवून त्याने कर्ज काढले. आता त्याला शिष्यवृत्ती देणे ही शासनाची जबाबदारी आहे. रोहित पात्र नाही, असे सरकार आता सांगत असेल तर तो आधी पात्र कसा ठरला? निवडणुकीदरम्यान सरकारने रोहितचा वापर केला. ओबीसींवर असा अन्याय सहन करणार नाही.**

**– सचिन राजूरकर,** महासचिव, ओबीसी महासंघ

# कंटेनरच्या धडकेने काका-पुतण्याचा मृत्यू

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन




**सातारा :** खंडाळा तालुक्यातील शिरवळ-लोणंद रस्त्यावरील भोळी येथील एसटी थांब्याजवळ कंटेनरने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत भोळी येथील चुलता-पुतण्याचा मृत्यू झाला. हा अपघात सोमवारी दुपारी चारच्या सुमारास झाला. अमोल रघुनाथ चव्हाण (वय ४०) व धनंजय बबनराव चव्हाण (५६, दोघे, रा. भोळी, ता. खंडाळा), अशी मृत चुलता-पुतण्याची नावे आहेत.

भोळी येथील अमोल चव्हाण व धनंजय चव्हाण हे दोघे शिरवळ येथे नातेवाइकांच्या साखरपुडा कार्यक्रमासाठी दुचाकी (एमएच ११ सीएक्स ११६५) ने आले होते. कार्यक्रम संपल्यानंतर हे दोघे शिरवळहून भोळीकडे परत येत असताना चारच्या सुमारास भोळी गावच्या हद्दीत असणाऱ्या एसटी थांब्याजवळ पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या कंटेनर ने दुचाकीला जोरदार धडक दिली. यात दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी अमोल चव्हाण यांना मृत घोषित केले, तर गंभीर जखमी धनंजय चव्हाण यांचा उपचार दरम्यान मृत्यू झाला.

◆ **अपघातानंतर टँकर चालकाने पलायन केले. याप्रकरणी शिरवळ पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. कंटेनर चालक गौरव विजय ढोरे (गड कुमली, ता. साकोरी, जि. भंडारा) विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक कीर्ती मस्के यांनी ही माहिती दिली, त्या अधिक तपास करत आहेत.**




# चिखली तालुक्यातील सवना येथे ड्रोन तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक

## नॅनो युरिया फवारणीचे मार्गदर्शन



● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलडाणा, (जिमाका) दि. 2 :** विकसित कृषि संकल्प अभियानांतर्गत चिखली तालुक्यातील मौजे सवना येथे नुकतेच शेतीतील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले. या उपक्रमात 'ड्रोनद्वारे नॅनो युरिया फवारणी'चे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे, शास्त्रज्ञ डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. सुकेशनी वने, डॉ. भारती तिजारे, श्री. प्रवीण देशपांडे, कोकिळा भोपळे, तसेच भारतीय कृषि अनुसंधान परिषद (भाकृअनुप) चे शास्त्रज्ञ डॉ. बेनुकांथा दास, तालुका कृषि अधिकारी कंकाळ, कृषि अधिकारी धांडे, पर्यवेक्षक सिताफळे, तसेच आत्मा योजनेचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री. खारोळे उपस्थित होते.

ICAR चे शास्त्रज्ञ थेट गावात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. प्रयोगशाळेतील ज्ञान प्रत्यक्ष शेतात पोहोचवून शेतीला वैज्ञानिक दृष्टिकोन देणे आणि कृषी क्षेत्र विकसित करणे हा या अभियानाचा उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. अमोल झापे, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा यांनी केले आहे.

कार्यक्रम IFFCO च्या सहकार्याने आणि कल्याण अटकळे (प्रक्षेत्र अधिकारी), शंतनू चवंड, योगेश पाटील (मार्केटिंग अधिकारी) यांच्या समन्वयातून पार पडला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये सवना येथील प्रगतशील शेतकरी व पत्रकार विजय भुतेकर यांचे विशेष योगदान राहिले.

**विकसित कृषि संकल्प अभियानांतर्गत 1 जून 2025 रोजी चिखली तालुक्यातील वळती, सवना, चांदई, धोडप आणि बुलढाणा तालुक्यातील बिरसिंगपूर, देऊळघाट, उमाळा, गिरडा, मढ गावांमध्ये अभियान राबवले गेले.**

**या अभियानाचा खरीप हंगामात सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा असून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यास मदत होईल. रोज आठ ते दहा गावांमध्ये वैज्ञानिकांचे पथक रथ यात्रेद्वारे विविध ठिकाणी पोहोचत असून शेती आणि विज्ञान यामधील दरी कमी करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.**

# शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या पूर्वसंध्येला शनिवार ५ जूनला बुलढाण्यात शिवव्याख्यान

## शिवव्याख्याते प्रशांत देशमुख मांडणार प्रतापगड पर्व !



♦ छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा ६ जून रोजी बुलढाणा येथे छत्रपती शिवाजी महाराज मंदिर व शिवस्मारकावर सकाळी शिवपूजनाने साजरा होणार आहे. शिवराज्याभिषेक दिन पूर्वसंध्येला म्हणजे शनिवार ५ जून रोजी वैचारिक तथा उद्बोधनभर शिवव्याख्यानाचे आयोजन सायंकाळी ७ वाजता "गोवर्धन" बुलढाणा अर्बन सभागृह येथे "प्रतापगडपर्व" या विषयावर केले आहे.

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलढाणा :** छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती बुलढाणाच्या वतीने शिवराज्याभिषेक ६ जूनच्या पूर्वसंध्येला म्हणजेच शनिवार ५ जून रोजी सायंकाळी ७ वाजता किल्ले रायगड येथील प्रख्यात शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांचे शिवव्याख्यान "गोवर्धन" सभागृह बुलढाणा अर्बन बँकेच्या मुख्य शाखेपुढे बुलढाणा येथे होणार आहे. या व्याख्यानातून देशमुख त्यांचे गाजलेले "प्रतापगड पर्व" मांडणार आहे.

राज्याभिषेक दिनी म्हणजे रविवार ६ जून रोजी सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज मंदिर येथे तर सकाळी ९ वाजता "शिवस्मारक" संगम बुलढाणा येथे शिवपूजन होणार आहे. तरी या शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याला व शिवव्याख्यानाला शिवप्रेमींनी उपस्थित राहावे, ही शिवविनंती छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बुलढाणा यांच्यावतीने करण्यात आली आहे.

# शेगावच्या गजानन महाराज पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान, ७०० वारकऱ्यांचा सहभाग



● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**शेगाव :** संत गजानन महाराज संस्थान मंदिराचा परिसर, रथ, मेणा अश्व, टाळ मृदूंगाचा गजर, नाम घोष, सातशे वारकरी, ओसंडून वाहणारा उत्साह आणि भारावलेले पवित्र वातावरण अशा थाटात अन् दिमाखात शेगावच्या गजानन महाराज पालखीने आज सोमवार, २ जून रोजी सकाळी श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान केले. विधिवत पूजन करण्यात आल्यावर पालखी सातशे वारकऱ्यांसह नागझरी येथील गोमाजी महाराज संस्थानकडे मार्गस्थ झाली.

## अकोल्यात दोन दिवस मुक्कामी

♦ **तब्बल ३३ दिवसांचा पायी प्रवास आणि ७२५ किमी चे अंतर कापून श्रींची पालखी ४ जुलै रोजी श्री क्षेत्र पंढरपूरला पोहोचणार आहे.**

♦ **श्रींची पालखी संतनगरी शेगावातून निघाल्यानंतर श्री क्षेत्र नागझरी येथील श्री संत गोमाजी महाराज संस्थान मध्ये पोहचणार आहे. महाप्रसाद घेऊन सायंकाळी अकोला जिल्ह्यातील पारस येथे श्रींच्या पालखीचा रात्रीचा मुक्काम राहील. ३ जुन रोजी पारस येथून निघून दुपारी गायगाव येथे तर रात्री भौरद येथे श्रींच्या पालखीचा मुक्काम राहील. ४ जून रोजी सकाळी भौरद येथून निघून अकोला येथे ४ व ५ जून असा दोन दिवस श्रींच्या पालखीचा मुक्काम राहील. त्यानंतर निर्धारित मार्गाने श्रींची पालखी ४ जुलै रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथे पालखी पोहोचणार आहे.**

♦ **३१ जुलैला स्वगृही श्री विठ्ठलाच्या पंढरीत श्रींच्या पालखीचा मुक्काम ४ जुलै ते ९ जुलै पर्यंत राहणार आहे. श्री गजानन महाराज संस्थानच्या पंढरपूर शाखेत श्रींच्या पालखीचा पाच दिवस मुक्काम राहणार आहे. श्रींच्या पालखीचा परतीचा प्रवास संत नगरी शेगाव कडे १० जुलै रोजी सुरू होईल. पंढरपूर ते शेगाव हा ५५० किमी चा प्रवास आहे. असा येण्या जाण्याचा १३०० किमीचा पायी प्रवास श्रींच्या पालखीतील वारकरी भक्ती भावाने आनंदात करणार आहेत. ३० जुलै रोजी खामगाव मुक्कामी राहिल्यानंतर ३१ जुलै गुरुवार रोजी श्रींची पालखी स्वगृही संतनगरी शेगावमध्ये दाखल होणार आहे.**

### पालखीचे हे ५६ वे वर्ष

पालखी सोबत भजनी दिंडी, गज व अश्वासह ५०० वारकरी सहभागी झाले आहे. संपूर्ण राज्यभरातून आषाढी एकादशीला श्री क्षेत्र पंढरपूरला विविध संतांच्या पालख्या दिंडीसह नेण्याची परंपरा वर्षानुवर्षांपासून आहे. शेगाव येथील श्री गजानन संस्थानची पालखी परंपरा १९६८ पासून अखंड सुरु आहे. यावर्षी पालखीचे ५६ वे वर्ष असून या दिंडीमुळे विवेक, वैराग्य, भक्ती व ज्ञान या तत्वांचा लोकांना बोध होतो.

आध्यात्मिक कार्य गतीमान होवून धर्माप्रती श्रध्दा व भावना वृध्दीगंत होतात. दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, व्यसनाधिनता अशा अनेक समस्यांनी ग्रासलेली अनेक छोटी गावे पायी वारीच्या वाटेत आहेत. श्री क्षेत्र पंढरपूरपर्यंत ७२५ कि.मी. आणि श्री क्षेत्र पंढरपूर ते शेगावपर्यंत परतीचा प्रवास हा ५५० किलोमीटर आहे. पालखीचा एकुण प्रवास १२७५ किलोमीटरचा आहे.

आज २ जून रोजी गजानन महाराज संस्थान मंदिर परिसरातून श्रींच्या पालखीला प्रारंभ झाला. शहरातील श्रींचे प्रगटस्थळ, देशमुख यांच्या मळ्यात वारकऱ्यांना फराळ, चहा देण्यात आला. तद्नंतर श्रींच्या पालखीने श्री क्षेत्र नागझरीकडे प्रस्थान केले संतनगरीतील हजारो आबालावृद्ध भाविकानी आपल्या पालखीला निरोप दिला.

### विविध व्यवस्था

श्रींचे पालखी सोबत असलेल्या वारकरी मंडळींना ठिकठिकाणी चहापानी व अल्पोपहाराची व्यवस्था राहते. तसेच श्रींच्या पालखीचे गावातील नागरीकाकडून मनोभावे श्री महाराजांना शाल, श्रीफळ वाहून स्वागत केल्या जाते. श्रींचे पालखी सोबत प्रवास करताना वारक-यांची दुपारी व रात्री भोजन प्रसादाची व्यवस्था केली जाते. त्याचप्रमाणे वाटेने चहापानी व फराळाची व्यवस्था सुध्दा श्रींच्या भक्तांकडून केल्या जाते.

रात्रीचे मुक्कामी निवासाची व्यवस्था धर्मशाळा, मंगल कार्यालय व शाळा यामध्ये केलेली असते. दिंडीतील वारकरी मंडळींना आवश्यकतेनुसार औषध, इंजेक्शन, सलाईन देवून सेवार्थ औषधोपचार करण्यात येतो. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याकरीता टँकरची व्यवस्था केलेली असते. शेगाव संस्थानने पायी वारीकरीता श्री महाराजांची चांदीची नवीन पालखी बनारस येथील कारागिर आणून तयार करून घेतली आहे. त्यावरील नक्षीकाम अत्यंत कलापूर्ण असून ही पालखी पाहताक्षणीच अंतःकरणातील भक्तीभाव उंचबळून येतो.

'जय हरी विठ्ठल श्री हरी विठ्ठल , जय गजानन श्री गजानन, गण गण गणात बोते', मंत्राचा नाम जप करीत वारकऱ्यांनी संतनगरीतून श्री विठ्ठलाच्या पंढरीकडे प्रस्थान केले.

# विश्वास करणे योग्य कुछ है तो पंचपरमेष्ठी है ! श्रमण मुनिश्री सुप्रभसागरजी महाराज



● दिव्य मातृछाया
● हफीज खान

**वाशिम :** स्थानिक अग्रसेन भवन में मुनि संघ के सानिध्य में सकल दिगंबर जैन समाज को मुनि श्री के प्रवचन सार विश्वासः निर्जीव की कीमत है पर जीवित की कीमत नहीं! उत्तर समय पर दे तो सही! नहीं तो समय की कोई कीमत नहीं!

इंसान ही विश्वास कर सकता है इंसान पर ही विश्वास कर सकता है जो भीतर जाकर तर जाता है! वह विश्वास पात्र होता है! पर आज के जमाने में मौसम का प्रिडिक्शन किया जा सकता है पर इंसान का नहीं. कितना विश्वास अपने पर है और अपनों पर है, लोक व्यवहार भी विश्वास के साथ होना चाहिए, विश्वास उसी का करना चाहिए जो आपका विश्वास करता हो, खुद को बदलने से खुद मिलता है पर को बदलने से परमात्मा नहीं मिलता विश्वास करने योग्य कुछ है तो पंच परमेष्ठी है यहां प्रवचन कर समय कर के आधार पर श्रमण मुनिश्री सुप्रभ सागरजी महाराजजीने अपने प्रवचन सार में कहा।



♦ प्रवचन के पूर्व गुरुदेव पट्टाचार्य मुनि श्री विशुद्धसागरजी महाराज ने के प्रतिमा का अनावरण एवं दीप प्रज्वल बाहर गांव से आए सौभाग्यशाली भक्तों द्वारा किया गया।

♦ मंगलाचरण चिखली जिला बुलढाणा के सौ. प्रिया वचन वायकोस की मधुर वाणी से किया। आज गुरुदेव का पाद प्रक्षालन, सौ.ज्योती दीपक जोगी, सौ. श्रुतीला नीरज जोगी, सौ. कीर्ती दुष्यंत जोगी गुरुभक्त परिवार को पुनर्जन प्राप्त हुआ। गुरुदेव को शास्त्रभेट सौ.कीर्ति जोगी, सौ.चेतनबाई चालीसगांवकर, सौ.ज्योति जोगी, सौ.अर्चना लवंडे गुरु भक्त परिवार द्वारा किया गया।

तो मुनिश्री १०८ प्रशमसागरजी ने कहां :सम्यक दृष्टि भगवान के पास शिकायत नहीं करता आस्था लेकर जाता है ! सम्यक दृष्टि जिंदगी की बांसुरी की तरह होती हैं जिसे बजाना आता है वह उत्तम स्तर निकल जाता है, जिसे नहीं बजाना आई वह भी भगवान की आराधना करके सीख लेता है। जो स्वयं को पा ले वह बहुत कुछ पा लेता है।

सैतवाल दिगंबर जैन अतिशय क्षेत्र वाशिम मंदिर परिसर में भव्य सिद्ध चक्र महामंडल विधान का आयोजन गुरुदेव श्रमण मुनिश्री १०८सुप्रभसागरजी महाराज जी के ससंघ सानिध्य में दिनांक 7 जून से किया जाएगा। इस पूजा विधान में ज्यादा से ज्यादा सहभागिता लेने की दरखास्त वीरेंद्र जोगी ने मंच से की एवम् कूपन लकी ड्रॉ सिस्टम द्वारा पूजा विधि में इंद्र का स्थान दिया जाएगा।

ऐसी माहिती मीडिया प्रमुख प्रशांत गडेकर से प्राप्त हुई.

# ड्रॅगन बोट स्पर्धेसाठी ३ जून रोजी निवड चाचणी



● दिव्य मातृछाया
● अफरोज पठाण

**किनगाव राजा :** जिल्ह्यातील युवकांसाठी दि.३ जुन रोजी ड्रॅगन बोट स्पर्धेसाठी सिं.राजा तालुक्यातील जळगांव येथे आयोजित करण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्हा ड्रॅगन बोर्ड ट्रेडिशनल वॉटर स्पोर्ट असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जिल्हास्तरावर निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील जळगांव येथे दीपक मुंडे यांच्या शेत जमिनीवर पार पडणार आहे या निवड चाचणीच्या माध्यमातून ता.६ ते ८ जून दरम्यान होणाऱ्या प्रथम राज्यस्तरीय सीनियर ड्रॅगन बोर्ड अजिंक्यपद स्पर्धासाठी जिल्ह्याचा संघ तयार करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील इच्छुक आणि पात्र खेळाडूंनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.ड्रॅगन बोट हा खेळ सध्या जल क्रीडा क्षेत्रात उगम पावत असलेल्या महत्वकांशी खेळपेकी एक मांडला जात आहे,जिल्ह्यातील खेळाडूंना राज्यस्तरावर झळकण्याची संधी युवकांना उपलब्ध झाली आहे. त्याचा लाभ जिल्हा ड्रॅगन बोट असोसिएशन वॉटर स्पोर्ट असोसिएशन कडून करण्यात आला आहे.

DAILY DIVYA MATURCHHAYA -Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by Shaikh Sadik Shaikh katthu Qureshi Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at At.Post. Malipeth, Imam Baba Chowk Mehkar, Tq.Mehkar, Dist. Buldana-443301(Mah.)
Editor SHAIKH SADIK SHAIKH KATTHU QURESHI Mob.No.9420647272 RNI.NO.MAHMAR/2022/87711
हे प्रकाशक, मालक शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर-जि.बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मु.पो.माळीपेठ, इमाम बाडा चौक, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक- शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी मोबा.9420647272 पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत
(टिप:- प्रकाशित झालेल्या जाहिरातीची जबाबदारी प्रकाशकाची नाही.)

# ताडशिवणी गावठाण फिडरवरील वीजपुरवठा नेहमीच राहते खंडित

## ग्रामस्थांचा आमरण उपोषणाचा इशारा

● दिव्य मातृछाया
● वसीम शेख

**सिंदखेडराजा :** तालुक्यातील ताडशिवणी येथील गावठाण फिडरवरील वीजपुरवठा दि.१० मे पासून वारंवार खंडित होत असून, सुरू असलेल्या वीजपुरवठ्यातही कमी-अधिक दाबाचा त्रास ग्रामस्थांना होत आहे. त्यामुळे गावातील नागरिकांना विविध विद्युत उपकरणांचे मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. मोटार, फॅन, टीव्ही फ्रिज, यांसारखी उपकरणे जळून जात असल्याचे अनेक तक्रारी समोर आल्या आहेत.




### सबस्टेशनमध्ये ग्रामस्थांचे ठिय्या आंदोलन

♦ गावठाण फिडरवरील वारंवार खंडित होणारा व कमी दाबाचा वीजपुरवठा, तसेच शेतातील वीजपुरवठा बंद असल्याच्या पार्श्वभूमीवर ताडशिवणी गावातील संतप्त ग्रामस्थांनी सोमवारी रात्री किनगावराजा येथील महावितरणच्या सबस्टेशनमध्ये ठिय्या आंदोलनही छेडले. यानंतर कामदार म्हणून नावाजलेले मतदारसंघाचे आमदार मनोज कायंदे यांच्याशीही ग्रामस्थांनी संवाद साधला यावेळी लवकरच पुरवठा सुरू करण्यात येईल असे आश्वासन आमदार महोदयांनीही यावेळी दिले होते.

♦ यावेळी ताडशिवनीचे सरपंचपती कैलास भुमकर, उपसरपंच रामकृष्ण देशमुख, सिद्धेश्वर शिंदे, ग्रामपंचायत सदस्य वामनराव देशमुख, संतोष देशमुख, मुकेश काळे, रघुनाथ शितोळे यांच्यासह ताडशिवनीतील असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी ताडशिवणी येथील ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत सदस्य वामन नारायणराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सिंदखेडराजा महावितरणचे उपअभियंता यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात स्थानिक कंत्राटी वायरमन शिवाजी मुंढे यांच्या अरेरावीच्या वागणुकीवरही संताप व्यक्त करण्यात आला आहे. शेतकऱ्यांचा वीजपुरवठा गेल्या एक ते दीड महिन्यापासून बंद असल्याने जनावरांना पाणी देण्याचीही अडचण निर्माण झाली आहे. यासंदर्भात मुंढे यांच्याशी संपर्क साधला असता, "फॉल्ट माझ्याकडे नाही" असे उत्तर मिळत असल्याची तक्रारही ग्रामस्थांनी निवेदनात मांडली आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस जवळ आले असताना अवकाळी पावसाचा जोर कायम आहे. वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास गावातील शेती व दैनंदिन जीवन पूर्णतः विस्कळीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तातडीने वीजपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा वामनराव देशमुख व ग्रामस्थांनी उपअभियंता यांना निवेदनातून दिला आहे.

# समृद्धी महामार्गावर उभ्या असलेल्या आयशरला पाठीमागून कारची धडक एक मृत्यू

● दिव्य मातृछाया
● गुलशेर शेख

**मेहकर :** अपघात दिनांक : 02/06/2025 चे 01/15 वा. दरम्यान अपघात ठिकाण Ch. No. 268 नागपूर कॉरिडोर. यावेळी एपीआय संदीप इंगळे सा सोबत पोलीस आमदार उदय गीते, चंद्रशेखर उबाळे, विकास कोळी असे रात्रगस्त पेट्रोलिंग करीत असताना छत्रपती संभाजीनगर कंट्रोल ने माहिती दिली.



नागपूर कॉरिडोर चॅनल नंबर 268 वर अपघात झाला म्हणून माहिती मिळताच रवाना होऊन अपघात स्थळी पोहोचलो असता मारुती सुझुकी बलेनो कार क्रमांक एम एच 37 व्ही 96 52 चे चालक भूषण मगरे वय 35 राहणार मानका जिल्हा वाशिम हे संभाजीनगर कडून वाशिम कडे जात असताना झोपेची डुलकी लागल्याने चालकाचे कार वरील नियंत्रण सुटून सदरची कार उभ्या असलेल्या ट्रकच्या मागून धडकून अपघात घडला कारचालक गंभीर जखमी असून त्यांना तात्काळ समृद्धी महामार्ग 108 ॲम्बुलन्सचे चालक सोळंकी व डॉ. स्वप्निल सुसर यांनी प्राथमिक उपचार करून मेहकर उपजिल्हा रुग्णालय येथे108 ॲम्बुलन्स द्वारे रवाना करण्यात आले वाहनाचे नुकसान झाले असून, QRV टीम फरदापुर यांच्या मदतीने वाहन क्रेनच्या सहाय्याने रोडच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# दिशा महिला अर्बनला सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मोताळा :** दिशा महिला अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी मर्या., बुलडाणा (रजि. क्र. ३७५) यांच्या लालमती (किन्होळा), ता. मोताळा येथील शाखेमार्फत संस्थेच्या सभासद श्रीमती अलका गोवर्धन जाधव (रा. हनवतखेड, ता. मोताळा) यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या वारसदारास १ लाख रुपयांचा विमा लाभ प्रदान करण्यात आला. हा उपक्रम संस्थेच्या सामाजिक बांधिलकीची आणि महिलांच्या आर्थिक सुरक्षेविषयी असलेल्या संवेदनशीलतेची साक्ष देणारा ठरला आहे.



♦ संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष ॲड. जयश्री शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली "सतीमाता महिला बचत गट – हनवतखेड" येथील १२ महिलांना गृहउद्योगासाठी प्रत्येकी ४०,००० कर्ज वितरित करण्यात आले होते. या सर्व महिलांना ICICI Lombard जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत दिशा महिला अर्बन संस्थेच्या माध्यमातून १ लाखांचे अपघात विमा कवच पुरविण्यात आले होते.

दुर्दैवाने, गटातील सदस्य श्रीमती अलका गोवर्धन जाधव यांचे दिनांक १९ नोव्हेंबर २०२४ रोजी पिंपळगाव देवी रोडवर अपघातात निधन झाले. यानंतर संस्थेचे विमा अधिकारी सुलतान शहा यांनी तातडीने विमा दाव्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून ICICI Lombard कंपनीकडून दावा मंजूर करून घेतला.

या अंतर्गत मंजूर झालेला १ लाख रुपयांचा विमा निधी, दिवंगत अलका जाधव यांची कायदेशीर वारस कु.सनैया गोवर्धन जाधव हिला दि. १५ मे २०२५ रोजी, लालमती शाखेत संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष ॲड.जयश्री शेळके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश शेळके, विमा अधिकारी सुलतान शहा, शाखा व्यवस्थापक व कर्मचारीवृंद तसेच स्थानिक खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिशा महिला अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाबरोबरच संकटसमयीही खंबीर साथ देणारी संस्था म्हणून आपली ओळख अधोरेखित केली आहे.

# जागतिक तंबाखू नकार दिवस' साजरा

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलडाणा, (जिमाका) दि. 02 :** राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्षामार्फत शनिवार दि. 31 मे रोजी जिल्हा रुग्णालय येथे जागतिक तंबाखू नकार दिवस साजरा करण्यात आला. यावेळी तज्ज्ञाव्दारे तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

♦ प्रमुख मार्गदर्शन डॉ. विश्वास खर्चे, सुनीता वैद्य व मीरा कोगदे यांनी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणाम व उपाययोजना संदर्भात माहिती दिली. जागतिक तंबाखु दिनानिमित्याने आयोजित रांगोळी स्पर्धेत विजेत्यांना बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मराठवाडा ग्रामीण विकास संस्थांच्या वतीने प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी देण्यात आली. त्याच बरोबर जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाच्यावतीने सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी सर यांच्या मार्गदर्शनाखाली तंबाखू नकार दिवस साजरा करण्यात आला. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रिंगे, बाह्य संपर्क वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण घाटे, कान, नाक, घसा तज्ञ व प्रमुख मार्गदर्शक डॉ. घोलप, डॉ. विश्वास खर्चे, डॉ. वैष्णव दंतशल्य चिकित्सक श्रीमती कुलकर्णी यांची उपस्थिती होती.




या कार्यक्रमाची सुरुवातीला ए.एन.एमच्या विद्यार्थी सलोनी पाखरे यांनी स्वरचित गीत सादर केले.

कार्यक्रमाच्या शेवटी तंबाखू मुक्तीची शपथ घेण्यात आली. या कार्यक्रमाला प्रशिक्षणार्थी एलएचपी व ए.एन.एम. च्या विद्यार्थिनी, रुग्ण, रुग्णांचे नातेवाईक, रुग्णालयीन कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सल्लागार तथा समुपदेशक लखन सरकटे यांनी केले.

सूत्रसंचालन अर्चना आराख व आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर मुळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील राजस, विशाल पवार, ज्ञानेश्वर पवार त्याचबरोबर इतर कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले.

# चिखली तालुक्यांतील १५ गावांत ४ व ११ जून रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान' शिबिरे !

## शेतकरी, विद्यार्थी व महिला यांच्या महसूल विभागांशी संबंधित समस्यांचा 'ऑन दी स्पॉट' होणार निपटरा !

● दिव्य मातृछाया
● महेंद्र हिवाळे

**चिखली :** जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत चिखली तालुक्यात महसूल विभागांतर्गत मंडळस्तरावर 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे' आयोजन करण्यात आले असून, तालुक्यातील पालकत्व स्विकारलेल्या सुमारे १५ गावांमध्ये ही शिबिरे दि. ४ जून २०२५ रोजी भानखेड, उदयनगर, शेळगांव आटोळ व एकलारा या गांवामध्ये तर दि.११ जून २०२५ रोजी अमडापूर, धोडप, पेठ व केळवद या गांवामध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आली आहेत, अशी माहिती चिखलीचे कर्तव्यदक्ष तहसीलदार संतोष काकडे यांनीदिली आहे.



सदर शिबिर आयोजित करतांना मंडळातील सर्व गावांचासुध्दा समावेश करण्यात आलेला आहे. जेणे करून सदरमंडळातील सर्व गावातील जास्तीत जास्त ग्रामस्थांना लाभदेता येईल. सदर शिबिरांमध्ये महसूल विभाग व इतर शासकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती तहसीलदार संतोष काकडे यांनी दिली आहे. तरी सर्व शेतकरी बांधवांनी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये' उपस्थित राहून विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही तहसीलदार संतोष काकडे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूलव वन विभाग, शासन निर्णयक्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३४/ई-८ दि.२५.०३.०२५ निर्णयानुसार महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकालात काढणे. तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी मंडळस्तरावर 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देशित केले आहे. त्या अनुषंगानें चिखली तालुक्यातील पालकत्व स्विकारलेल्या एकूण १५ गावांमध्ये शासन निर्णयानुसार, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाने निश्चित केलेल्या मानक एसओपी कार्यप्रणालीतील विषयाप्रमाणे चिखली तालुक्यातील पालकत्व स्विकारलेल्या गावांमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरे दि.०४ जून, २०२५ रोजी भानखेड, उदयनगर, शेळगांव आटोळ व एकलारा या गांवामध्ये आयोजित करण्यात आले. तसेच दि. ११ जून २०२५ रोजी अमडापूर, धोडप, पेठ व केळवद या गांवामध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत हे शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे.

# कि. राजा ग्रामपंचायतचे प्रयोगशाळेच्या अहवालानंतर आरो मशिनद्वारे शुद्ध पाणीपुरवठा सुरू!

● दिव्य मातृछाया
● सुरेश हुसे

**सिंदखेडराजा :** तालुक्यातील किनगाव राजा गावात दूषित पाण्यामुळे नागरिकांमध्ये साथीचे आजार वाढू लागल्याच्या पार्श्वभूमीवर, ग्रामपंचायतीने जलस्रोतांचे शुद्धीकरण करून पाण्याचे नमुने जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, बुलढाणा येथे तपासणीसाठी पाठवले होते.




दिनांक ३०मे रोजी प्राप्त झालेल्या प्रयोगशाळा अहवालानुसार ग्रामपंचायतीचा फिल्टर प्लॅन्ट, ते गणेश परमाळे यांची विहीर, सह पाठवलेले सर्व पाणी नमुने पाणी पिण्यायोग्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

♦ जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेच्या (अहवाल क्र. १७८२) सूक्ष्मजीवीय परीक्षणानुसार प्रति १०० मि.ली. पाण्यातील थरमोटॉलरंट जीवाणू कोलीफॉर्म आणि ई. कोलाई यांचे प्रमाण पिण्यायोग्य मर्यादित असल्याचे नमूद आहे. अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, अशुद्ध पाण्यावर योग्य प्रमाणात क्लोरिन प्रक्रिया करून पुनर्तपासणी केल्यानंतर ते पाणी सुरक्षितपणे पिण्यास वापरता येते.

ग्रामपंचायतीने अहवाल प्राप्त होताच बंद ठेवलेले आरो मशिन पुन्हा सुरू करून नागरिकांसाठी शुद्ध पाणीपुरवठा सुरू केला आहे. हे मशिन ग्रामपंचायत कार्यालयासमोर बसवण्यात आले असून अत्यंत नाममात्र दरात शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२५ मे रोजी आरो मशिनमध्ये जंतुनाशक किट बसवण्यात आले होते, तसेच गावातील विहिरींचे जलशुद्धीकरणही करण्यात आले आहे. यामुळे गावात साथीचे आजार रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ग्रामपंचायत आणि आरोग्य विभाग पाणी गुणवत्तेवर सातत्याने लक्ष ठेवून काम करत आहेत.

# धुळे जिल्ह्यात २२ लाखांचे बोगस बियाणे जप्त, गुजरातकडून येणाऱ्या खासगी बसमधून वाहतूक

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**धुळे :** जिल्ह्यात वेगवेगळ्या चार कारवायांमध्ये कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुमारे २२ लाख रुपयांचे बोगस बियाणे जप्त केले. या बियाण्यांना भारतात लागवडीची परवानगी नाही. सर्व बोगस बियाणे गुजरातमधून महाराष्ट्रात विक्रीसाठी आणले जात होते, अशी माहिती कृषी विभागातील जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक अरुण तायडे यांनी दिली.

सध्या राज्यात मान्सून दाखल झाल्याने पेरणीसाठी लगबग सुरु आहे. शेतकऱ्यांकडून कपाशीची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यासाठी त्यांच्याकडून बियाण्यांची प्रचंड प्रमाणात मागणी असते. त्यामुळे बोगस बियाण्यांची तस्करी वाढते. त्यावर आळा घालण्यसाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप यांनी विविध पथके तैनात केली आहेत. त्यातील जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक अरुण तायडे, उल्हास ठाकूर, मनोजकुमार सिसोदे, जगदीश बोराडे, मनोज पाटील, नितीन मासुळे यांच्या पथकाने जिल्ह्यातील वेगवेगळ्या चार ठिकाणी कारवाई केली.

शिरुड-बोरकुंड चौफुली येथे वाशिम येथून बोगस बियाणे घेऊन येणाऱ्या एकास ताब्यात घेतले. त्याच्या मोटारीतून बोगस बियाण्यांची पाकिटे जप्त केली.

# जनावराचा बाजार बंदचा आदेश तात्काळ रद्द करा

## शहर काँग्रेस कमिटीचे मागणी

● दिव्य मातृछाया
● शेख अफसर

**वसमत :** महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समितीला महाराष्ट्र गोसेवा आयोगाने 29 एप्रिल रोजी दिलेल्या पत्रकात ईद-उल-अजहा 2025 च्या पार्श्वभूमीवर राज्यभर जनावरांचे बाजार भरवू नयेत, असे अधिकार नसताना बेकायदेशीर आदेश दिले आहेत. जनावरांचा बाजार भरवला नाही तर केवळ गोवंश नव्हे तर बकरे, म्हशी, शेळ्या यांसारखी कोणतीही बंदी नसलेली जनावरेही गरजवंत शेळी पालक व शेतकऱ्यांना विकता येणार नाहीत.

या गोसेवा आयोगाच्या आदेशाविरोधात आज वसमत काग्रेस वतीने उपजिल्हाधिकारी वसमत यांना महाराष्ट्र गोसेवा आयोग यांनी अधिकार नसताना बाजार समितीला दिलेला आदेश तात्काळ रद्द करून जनावरांचा बाजार पूर्ववत सुरू करा अशी मागणी करण्यात आली.

यावेळी अब्दुल हफिज अब्दुल रहमान प्रदेश सरचिटणीस काँग्रेस, खालील अहमद माजी नगराध्यक्ष, रियाजुद्दीन कुरेशी मुन्ना मसरूर, एडवोकेट मोहम्मद हरून, शेख अलीमोद्दीन शहराध्यक्ष काँग्रेस, राजाराम खराटे तालूका अध्यक्ष काग्रेस, आमानुल्ला खान, हाजी शेख महेबूब, राजू पटाईत, बदर चाऊस, जाविद दोसती, सय्यद अज्जू, साईनाथ जाधव युवक काँग्रेस जिल्हा अध्यक्ष, खलील बागवान, एडवोकेट ऋषिकेश देशमुख माजी कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य, रवी किरण वाघमारे नगरसेवक, साईनाथ कुरुंदकर, राजकुमार इंगळे, तोहीद अबफल, डॉ नजीब शेख, वसीम बागवान, छोटू कठाळे, शे. इरफान बाले, सलाम बागवान, शेख नईम, मुदस्सीर सर, अतिक मॉडेल, चव्हाण इटली, आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



♦ सध्या शेतीचे पेरणीचे दिवस असून शेतकऱ्यांना बी बियाणे विकत घेण्याकरिता शेतकरी अडचणीत असताना अनेक शेतकऱ्यांनी जोडधंदा म्हणून शेळी, मेंढी पालन करून या उत्पन्नातून शेती पेरणीकरिता बी बियाणे विकत घेतात. परंतु महाराष्ट्र गोसेवा आयोग यांनी बेकायदेशीर पत्र काढून जनावराचे बाजार बंद केल्यामुळे अनेक शेतकरी अडचणीत आले आहेत.

# पुणे येथील स्वच्छता पथकाने जिल्ह्यातील पाच बस स्थानकांची केली पाहणी



● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलढाणा :** राज्यातील सर्व बसस्थानके स्वच्छ व्हायला पाहिजे या दृष्टिकोनातून एसटी महामंडळाने हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छता अभियान सुरु केले असून राज्यातील सर्व बस स्थानाकाची विविध स्वच्छता पथका मार्फत पाहणी करण्यात येत आहेत .

बुलढाणा जिल्ह्यातील् पाच अ वर्गाच्या बस स्थानकाची स्वच्छता पाहणी करण्यात येत आहे. बुलढाणा बस स्थानकाची पाहणी करण्यासाठी पुणे येथील पथक बुलढाणा येथे दाखल झाले होते. पथका मध्ये चार सदस्यांचा समावेश होता. त्यामध्ये पुणे येथील सौ अमृता ताम्हणकर प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक विभाग पुणे, गावडे, वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी, प्रादेशिक विभाग पुणे, समिती सदस्य संजय जाधव व प्रवासी मित्र विजय खंडागळे यांचा समावेश होता.

तर सौ शुभांगी शिरसाट, विभाग नियंत्रक बुलढाणा विभाग, जाधव वाहतूक अधिकारी राप बुलढाणा, अजय नाईक विभागीय अभियंता राप बुलढाणा, गडलिंग आगार व्यवस्थापक राप बुलढाणा, कृष्णा पवार बस स्थानक प्रमुख राप बुलढाणा यांची उपस्थिती होती.

या पाहणी मध्ये बस स्थानकातील चालक वाहक यांचे विश्रांती गृह, प्रवाशी महिला - पुरुष यांच्या वापरातील शौचालंय, गार्डन व्यवस्था आहे की नाही, बस स्थानकाची रंग रंगोटी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रवश्यांच्या सुरक्षेसाठी सिसिटीव्ही, बसेस स्वच्छता, पार्किंग व्यवस्था अश्या अनेक बाबतीत स्वच्छता पाहणी केली.

> **स्वच्छते विषयी केलेली पाहणी नंतर दिलेले गुण व माहितीचा अहवाल मध्यवर्ती एसटी महामंडळ कार्यालय मुंबई ला सादर करण्यात येईल दरम्यान एका वर्षात तीन वेळा बस स्थानकांची स्वच्छता पाहणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.**
>
> – **अमृता ताम्हणकर,** प्रादेशिक विभागीय अधिकारी पुणे

# गावात शव पेटी लवकर उपलब्ध करून देण्यात यावी

## प्रहार जनशक्ती पक्षाची लोणवडी ग्रामपंचायतला निवेदनाद्वारे मागणी

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मलकापूर :** गावात कोणाचे निधन झाल्यास त्या निधन झालेल्या व्यक्तीचे नातेवाईक खूप लांब असल्या कारणाने मृतदेह अंत्यसंस्कार करायला खूप उशीर लागत असून त्याचा मृतदेह काही वेळ घरात ठेवण्यासाठी शव पेटीची आवश्यकता असते त्यासाठी दुःखात जीवाची धावपड करून शहरात जावे लागते तिथं पण एखाद्या ठिकाणी वेळेवर शव पेटी उपलब्ध नसल्यास दुसरीकडून कुठ मिळेल यासाठी शोधत बसावे लागते.



दुःखाच्या डोंगरात त्यांना त्रासदायक कसोटीचा सामना करावा लागतो या वरील विषयाचे गांभीर्य लक्ष्यात घेता प्रहार वतीने निवेदनाद्वारे ग्रामपंचायत मध्ये ठराव लवकर घेऊन गावासाठी आवश्यकता असलेली शव पेटी लवकरात लवकर उपलब्ध करून या गावच्या सेवाकार्यात आपण योगदान द्यावे अशी निवेदन देऊन मागणी केली. निवेदन देते वेळी प्रहार सेवक अजाबराव वाघ, शाखा उपप्रमुख रवींद्र पाटील, समाज सेवक कृष्णा बावस्कार व प्रहार कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवनिर्वाचित संचालकांचा आ.डॉ. संजय कुटे यांचे हस्ते सत्कार

## खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे १४ संचालक विजयी

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**संग्रामपूर, दि. 2 :** तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक ३१ मे रोजी पार पडली. त्याचा निकाल १ जून रोजी घोषित करण्यात आला असून, यामध्ये शेतकरी परिवर्तन पॅनेलचा दणदणीत विजय संपादन केला आणि १५ पैकी या पैनल चे १४ संचालक विजयी झाले. या सर्व विजयी संचालकांचा आ.डॉ. संजय कुटे यांच्या हस्ते पुष्पहार घालून व पेढ़ा भरवून त्यांचे निवास स्थानी उत्सहात सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकरी परिवर्तन पॅनेलची विजयी पताका फडकवन्या साठी झटलेले संग्रामपूर तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



♦ आ.डॉ. कुटे यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनात ही निवडणूक लढल्या गेली यावेळी सूक्ष्म नियोजन करीत संग्रामपूर तालुका अध्यक्ष तथा कृऊबास सभापती भाऊराव पाटील यांच्या नवीनतम कार्यकाळात भाजपा प्रणित पॅनेलची ही पहिलीच निवडणूक संग्रामपूर तालुक्यात लढली गेली. यामध्ये विरोधी पॅनेल ला सोसायटी मतदारसंघातून एकच जागा निवडून आणता आली तर इतर सर्व म तदारसंघात शेतकरी पॅनेल चे छत्री या निशाणी वर एकूण १४ संचालक निवडून आले.

निकाल जाहीर झाल्या नंतर परिवर्तन पॅनेल चे सर्व विजयी उमेदवार, कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी फटाके फोडून, पेढे वाटून, ढोलताशे वाजवीत मोठा जल्लोष साजरा केला होता.

यावेळी कार्यकर्त्यांच्या जोरावर आपण संग्रामपूर तालुक्यालतील सहकार क्षेत्र पुर्णपणे काबीज केले असून ते निरंतर टिकवाण्याची जबाबदारी तुमच्यावर आली आहे. तसेच या निवडणुकी मधे शेतकऱ्यांनी पॅनेल वर दाखवलेला विश्वास आणि परिवर्तन पॅनेल मधील पदाधिकारी व कार्यकत्यांनी केलेल्या मेहनतीच्या जोरावर हा भरघोष विजय संपादन करता आला असुन सर्व विजयी संचालकांनी संग्रामपूर तालुका खरेदी विक्री संस्थेच्या माध्यमातून सर्वांच्या सहकायनि विकासात्मक व शेतकरी हिताची कामे करावी असे प्रतिपादन केले.

# बुलढाणा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शुक्रवारी शिवराज्यभिषेक दिनाचे आयोजन

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलडाणा, (जिमाका) दि. 02 :** श्री. पलसिद्ध महास्वामी शासकीय शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुलढाणा येथे शुक्रवार दि. 6 जून 2025 रोजी सकाळी 10 वाजता शिवराज्यभिषेक दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यामध्ये नागरी कर्तव्य, स्वदेशी विचारांचा प्रसार, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण या बाबत तज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार आहे. तरी या कार्यक्रमास प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्री. पलसिद्ध महास्वामी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी केले आहे.

♦ कौशल्य, रोजगार, उद्योजक नाविन्यता विभाग व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे मंत्री ना. मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून शिवराज्यभिषेक साजरा करण्यात येणार आहे. शिवराज्यभिषेक दिनाचे उद्घाटन ऑनलाईन पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे शुभ हस्ते होणार आहे.

# नगरमध्ये वर्चस्ववादातून, तर जामखेडमध्ये किरकोळ कारणातून गोळीबार

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**अहिल्यानगर :** जिल्ह्यात काल, रविवारी रात्री गोळीबाराच्या दोन घटना घडल्या. अहिल्यानगर शहर व जामखेडमध्ये घडलेल्या या घटनांत पोलिसांनी एकूण नऊ आरोपींना अटक केली आहे.

नगर शहरातील घटना



दोन गटांतील वर्चस्व वादातून, तर जामखेडमधील घटना तात्कालिक वादातून घडली. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या संदर्भातील माहिती दिली. अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे व वैभव कलबुर्मे, उपअधीक्षक अमोल भारती, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक दिनेश आहेर व तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे उपस्थित होते. नगर शहरातील घटनेत तीन जणांना अटक करण्यात आली.

# कुंभमेळ्यावर प्रभावासाठी भाजप मित्रपक्षांपेक्षा एक पाऊल पुढे

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**नाशिक :** सिंहस्थ कुंभमेळा हिंदू धर्मियांचा सर्वात मोठा उत्सव म्हणून ओळखला जातो. त्यामुळेच नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळ्यावर आपलाच प्रभाव राहील, याची पुरेपूर खबरदारी भाजपकडून घेतली जात आहे. त्यासाठी महायुतीत वादाचा केंद्रबिंदू ठरलेल्या नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा विषयही पूर्णतः बाजुला ठेवत भाजपने कुंभमेळ्याचे नियोजन पुढे नेण्याची तयारी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नाशिक दौऱ्यात ते अधोरेखित झाले.

नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा पेच पाच-सहा महिन्यांपासून सुटलेला नाही. अलीकडेच छगन भुजबळ हे मंत्री झाल्यानंतर सर्वाधिक सात आमदार असणाऱ्या राष्ट्रवादीने (अजित पवार) पुन्हा या पदावर दावा सांगण्यास सुरुवात केली. यापूर्वी भाजपचे मंत्री गिरीश महाजन यांची नाशिकच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती झाली होती. परंतु, शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) विरोधामुळे त्यास स्थगिती द्यावी लागली. जिल्ह्यात दोन आमदार असणाऱ्या शिंदे गटाला हे पद हवे आहे.

महायुतीतील कुणीही माघार घेत नसल्याने हा विषय रखडलेला आहे. या परिस्थितीचा कुंभमेळा नियोजनावर परिणाम होऊ नये, अशी तयारी भाजपने केली आहे. मागील कुंभमेळ्यात नियोजन, अंमलबजावणी, देशभरातील साधू-महंत व भाविकांचे आदरातिथ्य यावर भाजपचे एकहाती वर्चस्व होते. यशस्वी नियोजनाचे राजकीय लाभ होतात. त्यामुळे आगामी कुंभमेळ्यात त्याची पुनरावृत्ती करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे.

कुंभमेळ्यासाठी स्थापन केलेल्या शिखर समितीचे अध्यक्षपद मुख्यमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. भाजपचे संकटमोचक अशी प्रतिमा तयार झालेले गिरीश महाजन यांच्यावर कुंभमेळ्याची जबाबदारी सोपविली गेली आहे.

उभयतांकडून तयारीला वेग दिला जात आहे. यातून नाशिकला पालकमंत्री असला किंवा नसला तरी काहीही फरक पडत नसल्याचा संदेश दिला गेला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्यात साधू-महंतांशी प्रथमच बैठकीतून संवाद साधला गेला.



♦ मागील दौऱ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाशिकचा पालकमंत्री निश्चित होत नाही, तोपर्यंत मीच पालकमंत्री असल्याचे म्हटले होते. यावेळी कुंभमेळ्यातील मुख्य पर्वण्यांचे मुहूर्त निश्चित झाले. पालकमंत्रीपदाला मुहूर्त कधी लाभणार, या प्रश्नावर त्यांनी पालकमंत्री येतात, जातात. त्यांचा काय संबंध, नाशिकला पालकमंत्री नसल्यामुळे काही अडले आहे का, असा प्रश्न केला. कुंभमेळा मंत्री म्हणून गिरीश महाजन काम पाहत आहेत. दादा भुसे, नरहरी झिरवळ, छगन भुजबळ आदी मंत्री बरोबर आहेत. काही कमी पडल्यास आम्ही आहोत. कोणीही काळजी करू नये. सिंहस्थ कुंभमेळा हे आपले धार्मिक व सांस्कृतिक पर्व आहे. यामध्ये राजकारण आणू नका, असा सूचक संदेश त्यांनी सर्वांनाच दिल्याचे मानले जाते.